● मंगळवार, दि. ३ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२५ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जवेस्नहता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282






जालना शहरातील शनिमंदीर तसेच रेल्वे स्टेशनकडून नुतन वसाहत कडे जाणाऱ्या उड्डाण पुलावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्याचे चित्र आहे. या पुलावर ठिक-ठिकाणी खड्डे पडलेले आहेत. तर पुलावर असलेल्या विद्युत दिव्यांसाठी असलेले लोखंडी पोलही गायब झाले आहेत. या रस्त्यावरून मार्गक्रमण करतांना वाहनधारकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याकडे प्रशासनाने तात्काळ लक्ष द्यावे अशी मागणी वाहनधारकांतून होत आहे. (छायाचित्र किरण खानापुरे)

## मंगेश चिवटे सामाजिक आरोग्य दूत पुरस्काराने सन्मानित




**घाटकोपर । प्रतिनिधी -** मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाचे कक्षप्रमुख मुख्यमंत्री सचिवलायचे कार्यकारी अधिकारी मंगेश चिवटे यांना मराठा उद्योजक लॉबीच्या वतीने सामाजिक आरोग्य दूत पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.वैद्यकीय मदतीसाठी सदैव तत्पर असलेले तसेच राज्यभरातील गोरगरीब रुग्णांना दर्जेदार उपचार मिळावे यासाठी मंगेश चिवटे यांचे योगदान बघता त्यांना हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.मराठा उद्योजक लॉबी या सामाजिक संघटनेचा सातवा वर्धापन दिन रविवार दि.१ डिसेंबर रोजी विष्णूदास भावे नाट्यगृह,वाशी,नवी मुंबई येथे मोठ्या उत्साहात पार पडला.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या म ाध्यमातून,मराठा उद्योजक लॉबीच्या समन्वयातून दुर्धर आजार असलेल्या अनेक गरीब रुग्णांना वैद्यकीय मदत मिळाली असल्याचे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे कक्ष प्रमुख मंगेश चिवटे यांनी यावेळी सांगितले.मंगेश चिवटे यांनी मराठा उद्योजक लॉबीचे संस्थापक अध्यक्ष विनोद बढे आणि उपस्थित सर्व उद्योजकांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.मंगेश चिवटे यांनी कार्यक्रमाची सांगता होत असताना चार गरजू बांधवांच्या मेडिकल केसेस हाती घेतल्या आणि त्यांना पान २ वर

## घनसावंगीत कायदे विषयक महामेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशान्वये जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांचा म हामेळावा आयोजित करण्याचे निर्देशित केले आहे. त्यानुसार रविवार, दि. १५ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता शासकीय आय.टी.आय. कॉलेज, घनसावंगी येथे विधी सेवा महाशिबीर आणि शासकीय सेवा व योजनांच्या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या महाशिबिराचे नियोजन करण्यासाठी आज दि. ०२ डिसेंबर, २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षेतखाली बैठक पार पडली.

बैठकीस जिल्हा न्यायाधीश-३ किशोर एम.जयस्वाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता पी. भारसाकडे-वाघ, पान २ वर

## जागतिक एड्स दिन; प्रभात फेरीला युवकांचा प्रतिसाद





**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार दिनांक २ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा रुग्णालय जालना येथे जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फ ेरीचे आयोजन करण्यात आले होते. जालना येथील जिल्हा रुग्णालयात जागतिक एड्स दिनानिमित्त प्रभात फ ेरीचे उदघाट्न हिरवी झेंडी दाखवून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. रॅलीस युवकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

रॅलीची सुरवात जिल्हा रुग्णालय जालना येथून होऊन मार्ग सतकर कॉम्प्लेक्स, शनी मंदिर, गांधी चमन येथे समारोप करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांच्यासह डापकु, एआरटी, आयसीटीसी, सुरक्षा क्लिनिक इत्यादी विभागातील कर्मचारी वर्ग, तसेच अशासकीय संस्था यांच्यासह परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थीनी व कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी तसेच राज्य राखीव पोलिस दलाच्या बँड पथकासह पोलिस प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थी पोलिसांची उपस्थिती होती.

## भाजपाचा मुख्यमंत्री होणार! शिंदे बाहेरुन पाठींबा देण्याच्या तयारीत?

मुंबई - राज्यात महायुतीला न भुतो न भविष्यती असे बहुमत मिळाले आहे. असे असले तरी सत्ता स्थापनेचा घोळ काही मिटेना, शपथविधीचा सोहळा ठरला आहे, तारिख, वेळ आणि ठिकाणीही भाजपाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. या शपथविधी सोहळ्याच्या ठिकाणची पाहणी देखील भाजपाच्या नेत्यांकडून करण्यात आली आहे. त्यामुळै एक बाब स्पष्ट होत आहे की, राज्याला भाजपाचा मुख्यमंत्री मिळणार आहे. मात्र, देवेंद्र फडणवीस किंवा अन्य कुणी याबाबत कमालीची गुप्तता पाळण्यात येत आहे. एकनाथ शिंदे हे माघार घेण्याच्या मनस्थितीत नसल्याचे त्यांच्या वागण्या-बोलण्यातून स्पष्ट दिसून येत आहे. अशा वेळी एकनाथ शिंदे हे भाजपाला बाहेरून पाठींबा देण्याची शक्यता आता वर्तविली जात आहे. मुख्यमंत्री किंवा गृहमंत्री यापैकी एक पद शिवसेनेला हवे असल्याने भाजपासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. दुसरीकडे भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) एकत्र असल्याने त्यांना शिवसेना (एकनाथ शिंदे) यांची फारशी आवश्यकता नाही. मात्र, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेशी गद्दारी केल्याचा ठपका भाजपावर गेल्या पाच वर्षांपासून आहे. त्यातच शिंदेच्या शिवसेनेलाही सत्तेच्या बाहेर ठेवल्यास भाजपा केवळ वापरा आणि फेका या नितीचा अवलंब करते हे स्पष्ट होईल याचीच काहीशी चिंता भाजपाच्या वरिष्ठांना असल्याने शिंदे यांना सोबत ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न सुरु आहे.

विधानसभा निवडणुकीचे निकाल लागून आता दहा दिवस उलटत आहे तरी देखील सत्ता स्थापनेचा दावा अद्याप करण्यात आलेला नाही. मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर कोण बसणार याची अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तब्येतीचे कारण दाखवत महायुती समवेत होणाऱ्या बैठका रद्द केल्या आहेत. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या मनात काय सुरु आहे आणि ते नेमका कोणता निर्णय घेणार आहे हे स्पष्ट नाही. दुसरीकडे त्यांच्या पक्षातील नेते हे मुख्यमंत्रीपदाबाबतचा सस्पेन्स भाजपाचे शिर्ष नेते मोदी आणि शहा दोन दिवसात संपवतील, शहा यांच्यावर आम्हाला पुर्ण विश्वास आहे. ते जो निर्णय घेतील आम्हाला मान्य आहे असे म्हणताहेत. एकप्रकारे शिंदे यांचे शिलेदार अद्याप शिवसेना मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत अथवा गृहमंत्री पद पदरात पडणार असल्याचे संकेत देत आहेत.

भाजपाच्या नवनिर्वाचित आमदारांची बुधवार (दि ४) रोजी बैठक होत आहे या बैठकीत भाजपाचा विधीमंडळाचा नेता निवडला जाणार असल्याची माहिती पान २ वर

## मंदिर, मशिद, चर्चमध्येही आरसा ठेऊ, माणसातला देव अजूनही दिसणे बाकी आहे

### की.रू.बा. कविसंमेलनात डॉ.राज रणधीर

**जालना । प्रतिनिधी -** येथील म ुद्रा साहित्य सेवा संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या की. रू. बा. कविसंमेलनात निमंत्रित कवींच्या बहारदार काव्य रचनांच्या सादरीकरणामुळे काव्य रसिक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.

येथील स्व. किसनराव पवार, स्व. रुक्मिणबाई सारके, स्व. बाबुराव सारके यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रा. पंढरीनाथ सारके, प्रा. अपर्णा सारके यांच्या जालना शहरातील सोनल नगरस्थित निवासस्थानी शनिवार, ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजता की. रू. बा. कविसंमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी निमंत्रित कवींच्या एकापेक्षा एक सरस काव्य रचनांच्या बहारदार सादरीकरणामुळे हे कविसंमेलन यादगार ठरले.

सुरुवातीला डॉ. अंचला सिंग यांनी शास्त्रीय गायकीच्या मधुर स्वरात स्वागतगीत सादर केले. त्यानंतर प्रा.अपर्णा सारके यांनी प्रास्ताविक केले. यावेळी गझलकार कवि डॉ. राज रणधीर यांनी **'मंदिर, मशिद, चर्चमध्येही आरसा ठेऊ, माणसातला देव अजूनही दिसणे बाकी आहे'** ही गझल सादर करून उपस्थितांना अंतर्मुख केले. तर कवि प्रदीप घाटेशाही यांच्या

**पायावर विश्वास आहे तोपर्यंत मी चालत राहणार**
**शब्दावर विश्वास आहे तोपर्यंत मी बोलत राहणार**

या रचनेने रसिकांची दाद मिळविली. कवयित्री मनीषा गायकवाड यांनी सादर केलेल्या

**चुलीपासून ते चंद्रापर्यंतचा प्रवास पूर्ण करणारी ती**

या स्त्रीवादी कवितेने जाणीवा जागृत केल्या. कवयित्री छाया वाघ यांनी

**पैका देईन तुले सारं काही,**
**बाजारी भेटेल तुले हवं काही..**
**परी ढगाआड गेलेले मायबाप,**
**कशानं बी भेटत नाही..**

ही कविता सादर करून नात्यांची वीण



घट्ट केली. प्रा. कृष्णा कदम यांनी यांनी सादर केलेल्या

**'चांदणे नभाचे मोजत राहिलो मी विरहात पावसाच्या भिजत राहिलो मी'** या कवितेने रंगत वाढवली. पत्रकार कवि विनोद काळे यांनी सादर केलेल्या

**'तुझा चेहरा, सोनेरी पहाट जणू,**
**नभीचा इंद्रधनू, स्वप्नी येतो'**

या प्रेम काव्याने उपस्थित रसिकांना तारुण्य काळातील सफर घडवली.

या कविसंमेलनाला शहरातील साहित्यिक, कवि, कवयित्री यांची कुटुंबासह उपस्थिती होती हे विशेष. यावेळी डॉ.रंजन सिंग, डॉ. अंचला सिंग, ज्येष्ठ समाजसेवक रमेश देहडकर, रसना देहडकर, डॉ.प्रभाकर शेळके, सुनीता शेळके, गझलकार सुनील लोणकर, ज्योती लोणकर, मुद्रा साहित्य सेवा संस्थेचे अध्यक्ष कवि कैलास भाले, बबीता भाले, कवि सुहास पोतदार, गणेश खरात, मनीष पाटील, ज्योती पाटील, पान २ वर

संपादकीय पान

# अजरामर कवियत्री

मराठी साहित्यातील अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७३ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७३ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव

# नवज्योत बांदिवडेकर यांना 'पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक' पुरस्कार



५५व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२४ मध्ये नवज्योत बांदिवडेकर 'घरत गणपती' या त्यांच्या मराठी चित्रपटासाठी भारतीय चित्रपटासाठीचा पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार पटकावला आहे. हा पुरस्कार बांदिवडेकर यांचा दिग्दर्शनातील पदार्पणाचा प्रभाव अधोरेखित करतो आणि त्यांना चित्रपट उद्योगातील एक नव्या दमाचा प्रतिभावान दिग्दर्शक म्हणून पाहतो. भारतीय सिनेमाच्या उत्क्रांतीत युवा प्रतिभावंतांच्या योगदानाची दखल घेत देशभरात चित्रपट निर्मिती करणाऱ्या युवा प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाअंतर्गत राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाने यंदाच्या इफ्फी आवृत्तीसाठी भारतीय चित्रपटासाठीचा पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकाचा पुरस्कार नव्याने सुरू केला आहे. प्रमाणपत्र आणि ५ लाख रुपये रोख, असे स्वरूप असलेला हा पुरस्कार इफ्फीच्या समारोप सोहळ्यात नवज्योत बांदिवडेकर यांना त्यांच्या 'घरत गणपती' या मराठी चित्रपटाद्वारे प्रभावीरित्या मांडलेल्या कथेसाठी प्रदान करण्यात आला. परंपरेला आणि आधुनिक संवेदनांना जोडणारी हृदयस्पर्शी कथा सादर करण्याच्या क्षमतेबद्दल परीक्षकांनी बांदिवडेकर यांची दिग्दर्शक म्हणून प्रतिभा दाखवल्याबद्दल प्रशंसा केली. बांदिवडेकरांनी कौटुंबिक बंधांची गुंतागुंत मोठ्या खुबीने टिपली आहे. उत्कट भावनिक नादमयता कायम राखताना कौटुंबिक जीवनातील बारकावे उत्तमरीत्या अधोरेखित केले आहेत, त्यामुळे पहिल्याच प्रयत्नात चित्रपटाची भट्टी उत्तम जमली आहे, अशा शब्दांत ज्युरींनी त्यांचे कौतुक केले. पूर्वावलोकन समितीने शिफारस केलेल्या पाचही चित्रपटांचे पुनरावलोकन केल्यानंतर, ज्युरींनी त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बांदिवडेकर यांची एकमताने निवड केली. प्रशस्ती पत्रात ज्युरींनी 'घरत गणपती'चे सुरेख कथा सादरीकरण आणि दमदार अभिनयाबद्दल कौतुक केले आहे. वेगवेगळ्या पिढ्यांमध्ये काही छोटे मतभेद असले तरी कुटुंबातील ऐक्याचे प्रभावीरित्या दर्शन घडवले आहे, असे ज्युरींनी प्रशस्ती पत्रात नमूद केले आहे. सर्वोत्कृष्ट पदार्पणीय दिग्दर्शक या श्रेणीच्या ज्युरीमध्ये संतोष सिवन (अध्यक्ष), सिनेमॅटोग्राफर आणि दिग्दर्शक . सुनील पुराणिक, अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता;. शेखर दास, चित्रपट दिग्दर्शक आणि पटकथा लेखक;. एम. व्ही. रघु, सिनेमॅटोग्राफर आणि दिग्दर्शक; विनित कनोजिया, चित्रपट निर्माता, लेखक आणि संकलक यांचा समावेश होता.देशभरातील चित्रपट आणि कला समुदायातील प्रख्यात व्यावसायिकांचा समावेश असलेल्या पूर्वावलोकन समितीने ११७ पात्र प्रवेशिकांमधून पाच चित्रपट निवडले. भारतीय चित्रपटासाठीचा पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार श्रेणीसाठी स्पर्धा करणारे चित्रपट पहा.घरत गणपती मध्ये कुटुंबातील सर्व सदस्यांचे परस्परांमधील नाते विविध आनंदाने भरलेल्या तसेच गोंधळलेल्या परिस्थितीमधून शोधले आहे, असे नवज्योत बांदिवडेकर यांनी काही दिवसांपूर्वी पीआयबीने, गोवा येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले होते.

# मराठी वेब सिरीज 'लंपन' ने इफ्फी २०२४ मध्ये सर्वोत्कृष्ट वेब सिरीज (ओटीटी) पुरस्कार पटकावला

मराठी वेब सिरीज 'लंपन' ला ५५ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट वेब सिरीज (ओटीटी) पुरस्कार मिळाला आहे. उल्लेखनीय कथाकथन, उच्च निर्मिती मूल्ये आणि अपवादात्मक कामगिरी यासाठी या वेब सिरिजला हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.प्रकाश नारायण संत यांनी लिहिलेल्या कथांवर आधारित निपुण अविनाश धर्माधिकारी दिग्दर्शित 'लंपन' ही एका स्वप्नाळू मुलाची अपार उत्सुकता असलेली कथा आहे.डिजिटल सामग्रीमधील नावीन्यपूर्णतेचा उत्सव साजरा करणारा हा पुरस्कार, एक आकर्षक आणि विचारप्रवर्तक कथा वितरीत करण्याच्या त्यांच्या समर्पणाबद्दल निर्मात्यांना आणि लंपनच्या मागे असलेल्या ओटीटी प्लॅटफॉर्मला प्रदान करण्यात आला.डिजिटल सामग्रीमधील सर्जनशीलतेची भरभराट ओळखून, ५४ व्या आवृत्तीमध्ये सुरू करण्यात आलेला सर्वोत्कृष्ट वेब सिरीज (ओटीटी) पुरस्कार हा ओटीटी प्लॅटफॉर्मवरील उत्कृष्ट कथाकथनाचा गौरव करण्यासाठी एक परिवर्तनात्मक मैलाचा दगड आहे. जागतिक मनोरंजनावरील ओटीटी प्लॅटफॉर्मचा वाढता प्रभाव ओळखून या वर्षी पाच वेब सिरीज त्यांच्या कलात्मक तेज, कथाकथन चातुर्य, तांत्रिक उत्कृष्टता आणि सांस्कृतिक प्रभावासाठी निवडल्या गेल्या आहेत. सर्वोत्कृष्ट ओटीटी वेब सिरीज पुरस्कार रुपये १०,००,००० रोख पारितोषिकासह दिला जातो, जे निर्माते आणि ओटीटी प्लॅटफॉर्म दरम्यान सामायिक केले जातील. याशिवाय मालिकेच्या यशातील योगदान ओळखून वैयक्तिक प्रमाणपत्रेही दिली जातात.हा पुरस्कार मनोरंजन क्षेत्रातील सर्जनशीलता आणि नावीन्यपूर्णता जोपासण्याची इफ्फीची वचनबद्धता दृढ करतो. भारतीय भाषांमध्ये उच्च गुणवत्तेच्या सामग्री निर्मितीला प्रोत्साहन देऊन आणि जागतिक निर्माते आणि प्लॅटफॉर्म्समध्ये सहकार्य वाढवून, डिजिटल कथाकथनाचे केंद्र म्हणून भारताचे स्थान बळकट करण्याचे इफ्फीचे उद्दिष्ट आहे.




# भारतीय बौद्ध महासभेच्यावतीने कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर संपन्न

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा रायगड जिल्हा दक्षिण विभाग अंतर्गत तालुका शाखा तळा यांच्या विद्यमाने आज दि.३० नोव्हेंबर २०२४ रोजी मु. तळा मेकडे हॉल या ठिकाणी आयु.रामदास राघो शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर/चिंतन शिबीर संपन्न झाले. कार्यकर्ता शिबीरासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्य सरचिटणीस आयु.अशोकजी केदारे गुरूजी त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य संस्कार उपाध्यक्ष आयु.विजयजी कांबळे गुरूजी यांना पाचारण करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी तालुका तळा शाखेच्या कामकाजासाठी संपर्क कार्यालय स्थापन केले असून या कार्यालयाचे उदघाटन महाराष्ट्र राज्य पदाधिकारी आयु. अशोकजी केदारे तसेच आयु.विजयजी कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. तद्नंतर मानव आदर्शांच्या प्रतिमेचे पूजन करून तालुका तळा संस्कार उपाध्यक्ष आयु.नरेश मोरे गुरूजी यांनी सुत्रपठण केले. कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराचे उदघाटन रायगड जिल्हा दक्षिण विभाग अध्यक्ष आयु. संतोषजी जाधव गुरूजी यांनी दिपप्रज्वलन करून केले. कार्यकर्ता प्रशिक्षण शिबीराप्रसंगी आलेल्या तालुका पदाधिकारी, धम्म उपासक उपसिका यांनी आपापली ओळख दिली. कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरामध्ये जवळपास चार विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले, यामध्ये प्रामुख्याने दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची ध्येय/उद्दिष्टे आणि मिशन तसेच कार्यकर्त्यांची आचारसंहिता व प्रबोधन करण्याची आचारसंहिता या विषयावर आयु.अशोक केदारे गुरूजी यांनी महत्वपूर्ण मुद्दे विशद करून सखोल असे मार्गदर्शन केले, त्याचप्रमाणे शाखेच्या कामकाजाची पद्धत व हिशोब लिहिण्याची पद्धत तसेच पदाधिकाऱ्यांची जबाबदारी काय आहे याबाबत आयु.विजयजी कांबळे गुरूजी यांनी साध्या सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. कार्यकर्ता प्रशिक्षण प्रशिक्षणार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त केले यामध्ये आयु.भास्कर माळी, महादेव गवाणे, पांडुरंग गवाणे, मनोहर के.गायकवाड, महिमाताई जसवलकर,अनंत मोरे,आदी प्रशिक्षणार्थी व आयु.रामदास शिंदे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी रायगड जिल्हा दक्षिण विभाग कोषाध्यक्ष आयु.चंद्रकांतजी गायकवाड, संघटक सूर्यकांतजी तांबे, बापूजी कांबळे, महिला सरंक्षण विभाग आयुनि. साक्षीताई गायकवाड, जिल्हा महिला संघटक आयुनि.सारिकाताई नात्ते, बौध्दजन पंचायत समिती तळा तालुका अध्यक्ष आयु. अनंत मोरे व त्यांची कार्यकारिणी तसेच तळा तालुका संपूर्ण पुरुष कार्यकारिणी व तळा तालुका महिला अध्यक्षा आयुनि.सुषमाताई शिंदे व त्यांची संपुर्ण महिला कार्यकारिणी उपस्थित होती. या शिबिराचे सूत्रसंचलन आयु.सुरेंद्र शेलार यांनी केले व आभारप्रदर्शन तळा तालुका सरचिटणीस आयु.गणपतजी जगताप यांनी केले. या शिबिरासाठी आलेल्या पदाधिकारी,धम्म उपासक उपासिका यांच्यासाठी तालुका शाखेने भोजनाची व्यवस्था केली होती, सरणत्तय घेऊन कार्यकर्ता शिबीराचा समारोप करण्यात आला.



पान १ वरुन

## मंगेश चिवटे ...

वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहकार्य करण्याचा शब्द यावेळी दिला.यामध्ये ६ ते ८ महिन्याच्या मुलीच्या हृदयाची शस्त्रक्रिया,२२ वर्षाच्या मुलाचे हृदय ट्रान्सप्लांट,कार्यक्रम स्थळी आलेल्या पत्रकार भगिनीच्या वडिलांचे ट्रीटमेंट तसेच या कार्यक्रमाच्या सोशल मीडिया लाईव्ह मध्ये आलेल्या कमेंट मधील लहान मुलीच्या ब्रेन ट्यूमर च्या शस्त्रक्रियेसाठी केईएम मध्ये सहकार्य करणार असल्याचे मंगेश चिवटे यांनी सांगितले.या वर्धापन कार्यक्रमस्थळी ही मंगेश चिवटे यांच्या रुग्ण सेवेचं अविरत कार्य सुरू असल्याचे यावेळी दिसून आले.

वैद्यकीय मदतीसाठी सदैव तत्पर असलेले व्यक्तिमहत्त्व मंगेश चिवटे सामाजिक आरोग्य दूत पुरस्काराने सन्मानित झाल्यानंतर त्यांच्यावर विविध सामाजिक स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## घनसावंगीत कायदे ...

उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिपचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. तुबाकले यांच्यासह विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ आणि जिल्हा न्यायाधीश-३ किशोर एम.जयस्वाल यांनी बैठकीमध्ये शासनाच्या सर्व विभाग प्रमुखांना महामेळावा यशस्वी करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना देवून योग्य नियोजन करण्याचे निर्देश दिले. या महामेळाव्यात सर्व शासकीय योजनांची तोंड ओळख, तसेच विविध शासकीय योजनांची माहिती विविध स्टॉल्सच्या माध्यमातून लाभार्थ्यांना करुन देण्यात येणार आहे. या महामेळाव्यात विधी सेवा प्राधिकरण आणि विविध शासकीय विभागांचे स्टॉल एकाच छताखाली येणार असल्याने जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी या महामेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहुन योजनांचा लाभ घ्यावा असे, आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे-वाघ यांनी केले आहे.

## भाजपाचा मुख्यमंत्री ...

पुढे येत आहे. मुख्यमंत्रीपद निश्चित करण्याकरता भाजपाकडून जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. भाजपाने निरिक्षकांची नावे जाहीर केली आहेत. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी व वित्तमंत्री निर्मला सितारमण हे निरीक्षक म्हणून मुंबईत येणार आहेत.

एकनाथ शिंदे यांच्या अनुपस्थितीतच भाजपाने शपथविधी समारंभ ५ डिसेंबरला आयोजित करण्याची घोषणा केली. पण अजून महायुतीतील तीनही पक्षांना किती मंत्रीपदे मिळावीत, खातेवाटप कसे असावे आणि शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्याकडून मंत्रीपदांसाठी कोणाची निवड केली जाणार, या बाबींवर शिंदे, फडणवीस व पवार यांच्यात सोमवारपासून चर्चा सुरू होणार होती. परंतु, एकनाथ शिंदे यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांनी सर्व बैठका रद्द केल्या. शिंदे, फडणवीस आणि अजित पवार यांच्यातील चर्चेतून मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटपावरून तोडगा निघाला नाही तर पुन्हा दिल्लीत चर्चेची आणखी एक फेरी होण्याची शक्यता आहे.

तुर्त राज्याला नव्या मुख्यमंत्र्याच्या नावासाठी अद्यापही दोन दिवस प्रतिक्षा करावी लागणार अशीच चिन्हे आहेत.

## मंदीर, मशिद...

प्रा.हनमंत गोपछेडे, प्रा.राजकुमार बुलबुले, प्रा.महादेव गायकवाड, ज्ञानेश्वर वाहुळ, शिवाजी तेलंगे, बंडू काळे, रागिनी काळे, सुधाकर वाहुळे, तारामती वाहुळे, नवनाथ लोखंडे,आशा लोखंडे, लक्ष्मीकांत दाभाडकर यांच्यासह साहित्य रसिकांची उपस्थिती होती. हे कविसंमेलन सूत्रसंचालन विरहित होते. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. पंढरीनाथ सारके यांनी मानले.

पान ४ वरुन

## मजुरांचे सक्षमीकरण ...

लाभ दिला जातो. अटल पेन्शन योजनेचा लाभ दिला जातो. कामगारांच्या लहान मुलांना कामाच्या ठिकाणी पाळणाघर सुविधा दिली जाते. बांधकाम कामगारांना घरकुल योजनेचा लाभ दिला जातो. बांधकाम कामगार व त्याच्या पाल्यांसाठी अत्यावश्यक किट चे वाटप केले जाते. प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेचा लाभ दिला जातो. त्याचप्रमाणे इयत्ता १ ली ते ७ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या कामगारांच्या मुलांना प्रतिवर्षी २५००/- रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाते. अशी माहिती देखील यावेळी लोणीकरांनी उपस्थित बांधकाम कामगार बंधू-भगिनींना दिली.

निवडणुकीपूर्वी बांधकाम कामगारांना गृहपयोगी साहित्य संचाचे वाटप करणे संदर्भात आमदार बबनराव लोणीकरांनी पुढाकार घेत बांधकाम कामगारांना सेवा सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी मंठा, परतूर व सेवली या तीन ठिकाणी थंब कॅम्पचे आयोजन केले होते त्यामध्ये ९७८ नोंदीत बांधकाम कामगारांनी थंब देत गृहपयोगी साहित्याची मागणी केली होती त्यानुसार निवडणुकीपूर्वीच परतूर येथे ३४५ मंठा येथे ५०० बांधकाम कामगारांना गृहपयोगी साहित्य संचाचे वाटप करण्यात आले होते. निवडणूक निकालानंतर केवळ विजयी झाल्या निमित्त हार सत्कार स्वीकारण्यापेक्षा प्रत्यक्ष काम करण्यावर भर देत आमदार लोणीकरांनी उर्वरित १३३ लाभार्थ्यांच्या गृहपयोगी साहित्य संचाची मागणी संबंधित विभागाकडे करत आज त्या संचाचे वाटप केले. आमदार लोणीकरांनी मतदारसंघात थांबण्याऐवजी मुंबईला जावे अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली असता अगोदर ज्या जनता जनार्दनाने आपल्याला निवडून दिले सेवा करण्याची संधी दिली अगोदर त्यांचं काम करावे आणि त्यानंतर मुंबईला जाऊ अशी भावना आमदार लोणीकरांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

यावेळी गणेशराव खवणे सतीशराव निर्वळ पंजाबराव बोराडे नागेशराव घारे कैलासराव बोराडे संभाजी वारे मोहनराव आढे विलास घोडके सोपानराव वायाळ भगवानराव देशमुख विठ्ठलराव कदम गणेश राव घुगे गजानन शिंदे श्रीराम राठोड आनंद जाधव लक्ष्मण इलग माधव सिंग जनकवार मनोज देशमुख शेख रहीम वैभव नरवडे जयश्री पवार सोनाली खंदारे परमेश्वर शिंदे प्रकाश मोरे दिगंबर कांगणे प्रकाश वाघमारे नरेंद्र पाटील प्रभाकर बोरकर माणिक पवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# टेंभुर्णी येथील बांगड परिवाराच्या नाव्हा येथील रंगनाथ महाराज मंदिरात गोदान



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील बांगड परिवारची आत्मानंद सरस्वती श्री रंगनाथ महाराज यांच्या वरील भक्ती सर्व स्रोत आहे. येथील बांगड परिवार ने त्यांच्या एक भाग म्हणजे त्यांनी आपल्या शेतात श्री रंगनाथ महाराज यांच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा करून भव्य मंदिर तय्यार करून तिथे नित्य नियम भक्ती पूजा नामस्मरण आणि अन्नदान सुरू असते. ते त्यांची भक्ती मोठ्या भक्ती भावाने करत आहे. आज रंगनाथ महाराज यांच्या पुणयतिथीनिमित्त त्यांनी नुकतेच नाव्हा येथील आत्मानंद सरस्वती रंगनाथ महाराज मंदिर लां एक गाय/गोदान (गोमाता) आणि एक ढेप पोता आणि गूळ हे भेट स्वरूपात दीले.गोदान देणे ही माझी इच्छा होती असे सांगून आज आपली इच्छा पूर्ण झाल्याचे मत या वेळी गणेशलाल बांगड यांनी सांगितले. गोदान देता वेळी त्यांची विधिवत पूजा करून ही गोमाता त्यांना भेट म्हणून दिली.या वेळी त्यांच्या धर्मपत्नी सौ कांताबाई गणेशलाल बांगड आणि परिवार ने पूजा करून ही विधी पार पाडली. यावेळी महाराज बाळासाहेब जोशी आभार व्यक्त केले.

# १०० शिक्षक क्लब नवरात्रोत्सव स्पर्धा टेंभुर्णीच्या जेबीके व नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाच्या सहा विद्यार्थ्यांना बक्षीस

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** जालना येथील १०० शिक्षक क्लब तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी नवरात्रोत्सवात नऊ शैक्षणिक उपक्रम-सामाजिक परिवर्तनासाठी या उपक्रम ांतर्गत दि.३ ते १२ ऑक्टोंबर दरम्यान सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, निबंध लेखन, गीत गायन स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पर्यावरण संवर्धन व भारतीय संविधानावर आधारित सामान्य ज्ञान स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयातील १५० विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये भाग घेऊन नैपुण्य प्राप्त केले. या स्पर्धेचे नियोजन, उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख यांच्या नेतृत्वात करण्यात आले या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी राजेश शेवाळे डॉक्टर आनंद जाधव यांनी परिश्रम घेतले.यामध्ये कार्तिक कैलास जोशी वर्ग ८ वी, गौरी मुकुंद औटी वर्ग ९ वी, धनश्री नंदू शेळके वर्ग १० वी, कोमल गजानन ठेंग वर्ग १२ वी, जयश्री विष्णू गोरे वर्ग ६ वी, युवराज गजानन घायवट इत्यादी प्रशालेतील विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून हजारोच्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलं .. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री प्रवीण बाफना... उपप्राचार्य जे ई एस महाविद्यालय जालना, तर प्रमुख अतिथी म्हणून.. अहमद नुर.. जिल्हा प्रतिनिधी लोकमत टाईम्स, ए एस खिल्लारे... केंद्रप्रमुख काजळा, प्रा. डॉक्टर सुजाता देवरे... अंकुशराव टोपे महाविद्यालय जालना, डॉ. संजय येवते...



ज्येष्ठ अभिव्याख्याता डायट जालना.. तसेच माननीय श्री. शामराव देशमुख साहेब... उपशिक्षणाधिकारी जालना, आणी माननीय नागेश मापारी साहेब शिक्षण अधिकारी लातूर.. यांच्या शुभहस्ते वरील कार्यक्रम पार पडला.या सर्व विद्यार्थ्यांचे, संस्थेचे अध्यक्ष संजय काबरा, संस्थेचे उपाध्यक्ष शेख जमीर सर, संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी,संस्थेचे कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा माजी अध्यक्ष सुरेश शेठ काबरा, संस्थेचे जेष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख जी काबरा, संचालक तथा माझी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, ज्येष्ठ संचालक तथा राजीव काबरा, ज्येष्ठ संचालक तथा दीपक काबरा, संचालक मधुकरराव निकम, संचालक विश्वनाथ सांगोळे, संचालक तथा उपप्राचार्य प्राध्यापक दत्ता देशमुख, संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, प्राचार्य नंदकुमार काळे, पंजाब सोळंके, धनंजय पुरानी,सखाराम बोरकर, भिवसान ससाणे, तथा सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सर्व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे

# नगर विकास विभागाच्यावतीने शहरात जनजागृती अभियान

## उपआयूक्त नंदा गायकवाड यांची माहिती

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या वतीने जालना शहरात सोमवार (दि २) ठीक ठिकाणी स्वच्छतेविषयी जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. यासाठी पथनाट्य, गीत गायन तसेच विविध माध्यमातून उपक्रमाच्याद्वारे नागरिकांमध्ये स्वच्छतेविषयी तसेच घनकचरा, प्लास्टिक व इतर कचऱ्यांच्या बाबतीत जनजागृती करण्यात येत आहे. जालना शहरातील रेल्वे स्टेशन, वीर सावरकर चौक, महानगरपालिका कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा तसेच गांधी चमन या परिसरामध्ये पथनाट्याच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. शहरांच्या महत्त्वकांक्षा आणि स्वप्नांना उत्तेजन मिळून शहरे रहिवाशांसाठी एक आदर्श शहर बनणार आहे आणि शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची नियमित शास्त्रशुद्ध पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येणार असल्याने कचरामुक्त शहरे हा उपक्रम राबविण्यात येत आहे. तसेच ओला कचरा, सुका कचरा, बायो मेडिकल घातक कचरा याबाबतीत पथनाट्याच्या माध्यमातून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे. यावेळी महानगरपालिकेच्या उपआयूक्त नंदा गायकवाड यांच्यासह कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.



# ... त्यामुळे विधानसभेच्या निकालावर जनतेला संशय- दिनकर घेवंदे



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालावरून राज्यभरात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम असून निवडणूकीच्या दिवशी सायंकाळी पाच वाजे नंतर रात्री अकरा वा.पर्यंत प्रचंड प्रमाणात मतांच्या आकडेवारी मध्ये वाढ झाली असून ही बाब शंभर टक्के शंका घेणारी असल्याचे जालना कॉंग्रेस चे अनुसुचित जाती विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष दिनकर घेवंदे यांनी प्रश्न ऊपस्थित केला. याबाबतीत मतदानामध्ये पडलेले मत आणि मतमोजणी मधील मतपेटीतील मत यामध्ये मोठी तफावत असून या बाबींवर सोमवार (दि २) रोजी दुपारी तीन वा.च्या सुमारास शहरातील गांधी चमन येथे दिनकर घेवंदे यांनी माध्यमांशी संवाद साधून निवडणूक विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह ऊपस्थित केले.

# रंगनाथ महाराज यांच्या मंदिरचा कळस कारागीर यांच्या हस्ते बसविण्याचा मान

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** देवाची भक्ती भाव असला की माणूस कोणतीही सेवा आणि कोणतेही खर्च करण्यास मागे पाहत नाही. त्याच्याच एक भाग म्हणजे येथे स्टाईल मार्बल बसविणाऱ्या कारागीर मुकेश मुलचंद स्वामी या तरुण कारागीर यांनी टेंभुर्णी येथील खलसे यांचा शेतात रंगनाथ महाराज यांचे काही काळ विसावा साठी थांबले होते अशी माहिती आहे. त्या मुळे येथे त्यांची मूर्ती चे छोटे मंदिर होते. मात्र ते खूप जुने झाले होते. येथील भक्तिभाव मुकेश यांच्या मनात आला आणि त्यांनी आपल्या खर्चातून आणि स्वतः हा काम करागिरी करून एक सुंदर आणि सुबक मंदिर तय्यार केले.हे झालेले मंदिर खूप आकर्षक आणि खूप चांगले बनल्या मुळे या मंदिराचे कळस खुद मुकेश स्वामी यांच्या हस्ते बसवून त्यांना हा मान बहुमान देऊन एक चांगला संदेश या विश्वसत मंडळ यांनी दिला. या वेळी. मंदिराचे प्रमुख दगडूबा खलसे सर रामराव जमधडे अंबादास भोरे अशोक महाराज भीमराव जमधडे शेख जमीर सर भागाजी वाघमारे बाबुराव तांबेकर गंगाराम धनवई रामेश्वर महाराज देठे जोशी गुरुजी राजू करवंदे संतोष सांगुळे संतोष घोडके यांच्या सह भक्ती मंडळ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्याम ठाणेदार यांचा संविधान रक्षक पुरस्काराने गौरव



**दौंड । प्रतिनिधी -** सम्यक ग्लोबल फाऊंडेशन, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( ए ) दौंड यांच्या मार्फत देण्यात येणारा जिल्हास्तरीय संविधान रक्षक पुरस्कार २०२४ स्तंभ लेखक श्याम ठाणेदार यांना संविधान दिनी मान्यवरांचा हस्ते समारंभपूर्वक देण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिनाचे औचित्य साधत २६ नोव्हेंबर रोजी दौंड येथे संविधान सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी समाजातील विविध मान्यवरांना संविधान रक्षक, रिपब्लिकन योद्धा, समाज रत्न व माता रमाई रत्न अशा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. श्याम ठाणेदार हे विविध वर्तमानपत्रातून महापुरुषांचे विचार पोहचवण्याचे तसेच आपल्या लेखणीच्या माध्यमातून संविधान जागृतीचे काम करतात त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. संविधानची पुस्तिका व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( ए ) महिला उपाध्यक्षा प्रियदर्शनी ताई निकाळजे, मराठी मुस्लिम चळवळीचे प्रणेते व दंगा मुक्त महाराष्ट्र अभियानाचे अध्यक्ष माननीय शेख सुभान अली, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ( ए ) चे जिल्हाध्यक्ष सचिन खरात, माजी शिक्षणाधिकारी बी वाय जगताप, प्रा. भीमराव मोरे, आबासाहेब वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# सावधान! भयावह रस्ते अपघात चिंताजनक

दिवसेंदिवस अपघातांचे प्रमाण कमी न येता वाढतच आहे. राज्यातील अनेक भागातुन आपल्याला दररोज एक-ना-एक भयावह अपघात झालेला दिसतो.असे अपघात होत आहे की ज्याची आपण कल्पनासुद्धा करू शकत नाही.अशाप्रकारचे अंगावर शहारे येणारे अपघात राज्यात कुठेना कुठे दिसुन येतात हे संपूर्ण अपघात मानवांच्या चुकांमुळे होत आहे.यावर नियंत्रण आणने काळाची गरज आहे. दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ ला सरस्वती विद्यालयातील विद्यार्थ्यांना बोर अभयारण्य येथे सहलीला घेऊन जाणारी खाजगी बस हिंगणी रोडवरील पेंढरी घाट परिसरात सकाळी ९.३० च्या सुमारास खायीत कोसळली यात एका विद्यार्थ्यानीचा मृत्यू झाला व अनेक गंभीर जखमी झालेत.याघटनेमुळे पालकांचे अश्रू आवरेना या भयावह दुःखद घटनेमुळे नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.त्याच दिवशी २६ नोव्हेंबरला कामठी परिसरात वेगात आलेला ऑटो उभ्या क्रेनवर आदळल्याने दोन महिला प्रवासी जागीच ठार झाल्यात तर चालकासह सहा प्रवासी गंभीर जखमी झाले. दिनांक २६ नोव्हेंबरला कामठीतील गरूड चौक परिसरात सकाळी ५ वाजताच्या सुमारास आणखी भयावह घटना घडली भरधाव कार लोखंडी रेलिंगला धडकल्याने रेलिंग कारच्या आरपार घुसून युवकाचा मृत्यू झाला तर दोन अन्य जखमी झालेत.या संपूर्ण घटना ताज्या असतांनाच दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ ला गोंदिया जिल्ह्यातील डव्वाजवळ शिवशाही बस उलटून ११ प्रवासी ठार तर २९ गंभीर प्रवासी गंभीर जखमी झालेत. यावरून स्पष्ट होते की देशात किंवा राज्यात मोठ्या प्रमाणात उडानपुल, सिमेंट रोड, समृद्धी महामार्ग व अत्याधुनिक सुविधा असुनसुद्धा आपल्या डोळ्यासमोर गंभीर अपघात होतांना दिसतात. वाढत्या अपघातांचे मुख्य कारण म्हणजे वाहन चालकांच्या चुका किंवा वाहनांवरील नियंत्रण जाणे किंवा दुसऱ्याला वाचविण्यासाठी चुकीच्या मार्गांचा अवलंब केल्याने दुर्घटना होतांना दिसतात.गोंदियातील अपघात हा सडक अर्जुनी -गोंदिया मार्गावरून शिवशाही जात असतांना खजरी-डव्वा गावाजवळ दुचाकीला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात चालकांचे बसवरील नियंत्रण सुटले व बस उटली आणि मोठा घात झाला. म्हणजेच छोटीशी चूक जीवावर कशी बितते हे या अपघातांचे जिवंत उदाहरण आहे.याचप्रकारे बोर अभयारण्य येथे सहलीला घेऊन जाणारी खाजगी बस पेंढरी घाट परिसरात नागमोडी वळणावर बसचालकाचे नियंत्रण सुटले आणि मोठा घात झाला.हिट न्ड रन, वाहन चालवितांना मोबाईलवर बोलणे, रस्त्याचे खड्डे अशा अनेक कारणांमुळे वाहन चालकांचा जीव धोक्यात येतोच सोबतच पायदळ चालणारे किंवा इतर वाहनचालक किंवा त्या वाहनांमध्ये बसणाऱ्या प्रवाशांचा सुध्दा जीव धोक्यात येऊ शकतो याचे जिवंत उदाहरण आपणा सर्वांसमोर आहेच. खाजगी वाहन चालक आपला वेळ वाचवण्यासाठी किंवा जास्त ट्रीप व्हाव्यात या उद्देशाने वाहन अतिवेगाने चालवितात व अशा चुकांमुळे सुध्दा अपघात होतांना दिसतो.गोंदियातील शिवशाहीच्या अपघातामुळे शिवशाहीवर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळात (एसटी) सर्वाधिक अपघातांचे प्रमाण हे शिवशाहीचे आहे असे उघडकीस आले आहे.शिवशाही वाईट अवस्थेत असतांनाही महामंडळाकडून वातानुकूलितच्या नावाने सर्वाधिक प्रवासी भाडे आकारले जाते.गोंदिया जिल्ह्यात शिवशाही बसला झालेल्या अपघातामुळे शिवशाही बसच्या वाईट अवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.यावरून स्पष्ट होते की सध्याच्या परिस्थितीत शिवशाही बसचे मेंटेनन्स व्यवस्थीत नसल्याने अत्यंत खराब अवस्थेत असल्यामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहे.राज्यात एसटी महामंडळाच्या ताफ्यात १५ हजार ६०० च्या जवळपास बसेस आहेत. त्यात ८९२ शिवशाही बसेसचा समावेश आहे.करोना काळात प्रवासी सेवा बंद पडल्यानंतर एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती वाईट झाली. तेव्हापासुन सातत्याने महामंडळात बसच्या सुट्या भागांच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे.त्यामुळे अनेक एसटी बसेस अपघातांचे सुध्दा कारण बनत आहे.या संपूर्ण बाबींवर सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.भारतात प्रत्येक तासाला ५३ रस्ते अपघात होतात;त्यात प्रत्येक तासाला १९ लोकांचा मृत्यू होतो असे एका अहवालात नमूद केले आहे. म्हणजे देशात किंवा राज्यात रस्ते अपघात कमी झाले नसुन वाढल्याचे दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे रस्त्याचे खड्डे, रोडचे बांधकाम, वाहनांचे ब्रेक बरोबर नसने,वाहन चालवितांना मोबाईलचा वापर, वाहनांचे मेंटेनन्स वेळोवेळी न करणे,मद्य पीवुन वाहन चालविणे अशा प्रकारच्या अनेक कारणांमुळे भयावह अपघातांचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.त्यामुळे वाढते भयावह रस्ते अपघात पहाता वाहन चालकांनी वाहनावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.महाराष्ट्रासह देशात होणारे ८५ टक्के अपघात हे वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे किंवा चुकांमुळे होत असल्याचे दिसून येते,तर १५ टक्के अपघात हे प्रशासनाच्या चुकांमुळे होतांना दिसतात.एवढे माहीत असूनही वाहन चालक आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यास असमर्थ असल्याचे दिसून येते.त्यामुळे कोणतेही वाहन चालवितांना काळजी पूर्वक वाहन चालवावे.कारण थोडीशी चुक मृत्यूचे कारण बनू शकते याला नाकारता येत नाही.त्यामुळे वाहन चालकांनो सावधान!आपल्या वाहनांवर नियंत्रण ठेवा व स्वतः सुरक्षित रहा व दुसऱ्यांना सुध्दा सुरक्षित ठेवा.जान है तो जहान हैहा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे व अपघात टाळले पाहिजे.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)**
**मो.नं.९९२१६९०७७९.**

# शिंदेचा मान दिल्लीने ठरवावा - केसरकर

**मुंबई -** आमच्या नेत्याने शिवसेना कोणाची हे सुद्धा सिद्ध करुन दाखवलं. आता त्यांचा कशा रीतीने मान राखायचा हे दिल्लीने ठरवायचं, आम्ही ठरवणार नाहीत, असं सूचक वक्तव्य शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार आणि माजी मंत्री दीपक केसरकर यांनी केलं आहे. ते मुंबईत पत्रकारांशी बोलत होते. दीपक केसरकर म्हणाले, ५ तारखेला शपत विधी होणार आहे, पण अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. म्हणून मी ही पत्रकार परिषद घेत आहेत. एकनाथ शिंदे हे काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत.


## जाहीर निवेदन

या विभागाच्या अख्त्यारीत असलेली अनुज्ञप्ती FL-३/५१४४४०२/९९१९९ चे अनुज्ञप्तीधारक पोपट अजबसींग चुंगडे यांचे दिनांक - १५/०८/२४ रोजी निधन झाले असून, त्यांच्या निधनानंतर कोणत्याही कायदेशीर वारसदार यांनी पुढील प्रक्रिये संदर्भात निम्न स्वाक्षरीकर्त्याच्या कार्यालयाशी कोणत्याही प्रकारे संपर्क केलेला नसून या निवेदनाद्वारे असे जाहीर आवाहन करण्यात येते की, FL- ३/५१४४४०२/९९१९९ चे मयत अनुज्ञप्तीधारक पोपट अजबसींग चुंगडे यांचे कायदेशीर वारसदार यांनी या कार्यालयाशी १५ दिवसात आवश्यक ती कागदपत्र सादर करुन संपर्क साधावा.

निवेदन प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसात कोणी या कार्यालयास संपर्क साधला नाही, तर FL-३/५१४४४०२/९९१९९ चे मयत अनुज्ञप्तीधारक पोपट अजबसींग चुंगडे यांना कोणीही कायदेशीर वारसदार नाही असे गृहीत धरून सदरहू अनुज्ञप्ती ही कायम स्वरूपी शासन समर्पित करण्यात येइल याची नोंद घ्यावी.

-स्वा-

**निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जालना.**

# मजुरांचे सक्षमीकरण करण्यावर महायुती सरकारचे लक्ष

## माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांचे प्रतिपादन; मंठा येथे १३३ नोंदीत बांधकाम कामगारांना १७ प्रकारच्या गृहपयोगी वस्तू संचाचे वितरण

**मंठा । प्रतिनिधी -** राज्यात विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बांधकाम कामगार कार्यरत आहेत जे स्वतःच्या घरापासून दूर ऊन, वारा व पावसात स्वतःची पर्वा न करता काम करत असतात बांधकाम क्षेत्रातील कामगार हे तुटपुंजा पगारात काम करत असतात त्यामुळे त्याची आर्थिक परिस्थिती कमकुवत असते त्यामुळे त्यांना स्वतःच्या कुटुंबाचा सांभाळ करण्यासाठी व त्यांच्या गरज पूर्ण करण्यासाठी खूप साऱ्या समस्यांचा सामना करावा लागतो तसेच काम करताना त्यांच्याजवळ सेफ्टी किट नसल्यामुळे त्यांना विविध प्रकारच्या अपघातांचा सामना करावा लागतो ज्यामध्ये त्यांना कायमस्वरूपी अपंगत्व येते व काही वेळेला त्यांचा मृत्यू देखील होतो व घरातील कमावणाऱ्या व्यक्तीच्या एकाएकी जाण्यामुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. त्यामुळे राज्यातील बांधकाम कामगाराच्या या सर्व समस्यांचा विचार करून राज्य शासनाने १ मे २०११ रोजी कामगारांसाठी कल्याणकारी मंडळाची स्थापना केली असून बांधकाम कामगारांच्या चांगल्या भविष्यासाठी बांधकाम प्रकल्पांमध्ये गुंतलेल्या मजुरांचे सक्षमीकरण करण्यावर महायुती सरकारचे लक्ष दिले होते आणि यापुढे देखील आवर्जून या सर्व बाबींवर लक्ष राहील असे प्रतिपादन माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले.

माऊली मंगल कार्यालय मंठा येथे आयोजित नोंदीत बांधकाम कामगारांना १७ प्रकारच्या गृहपयोगी वस्तू संचाचे वितरण कार्यक्रम प्रसंगी आमदार लोणीकर बोलत होते यावेळी १३३ बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संचाचे वितरण आमदार लोणीकरांच्या हस्ते करण्यात आले पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, इमारत व इतर बांधकाम या व्यवसायात काम करणाऱ्या बांधकाम कामगारांना संबंधित आस्थापनेचे काम पूर्णत्वास आल्यावर रोजगारासाठी नविन बांधकाम जेथे सुरु होते तेथे स्थलांतरीत व्हावे लागते. अशा स्थलांतराच्या ठिकाणी त्यांना नव्याने निवास, पाल्यांचे शिक्षण, आरोग्यविषयक समस्या व भोजन याबाबत जुळवुन घ्यावे लागते. त्यांना दैनंदिन भोजन तयार करण्यास सहाय्य व्हावे म्हणून महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वितरण करण्याचा एक महत्वपूर्ण निर्णय घेतला होता, हा निर्णय यापुढे देखील असाच सुरू राहील यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे देखील लोणीकरांनी यावेळी स्पष्ट केले.

बांधकाम कामगारांना गृहपयोगी भांड्यांचे मोफत वाटप करणे त्यांचे जीवनमान सुधारणे हा या मागचा प्रमुख उद्देश असून ताट ०४, वाटया ०८, पाण्याचे ग्लास ०४, पातेले झाकणासह ०३, मोठा चमचा (भात व वरण वाटपाकरीता) ०२, पाण्याचा जग (२ लीटर) ०१, मसाला डब्बा (७ भाग) ०१, डब्बा झाकणासह (१४ इंच) ०१, डब्बा झाकणासह ०२, परात ०१, प्रेशर कुकर ५ लिटर (स्टेनलेस स्टील) ०१, कढई (स्टील) ०१, स्टीलची टाकी (मोठी) झाकणासह व वगराळासह ०१ असे एकूण ३० नग गृहपयोगी साहित्य या संचामध्ये देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील बांधकाम कामगार हे राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात. ते रस्ते, इमारती, पूल आणि इतर अनेक बांधकाम प्रकल्पांवर काम करतात. हे काम कठीण आणि धोकादायक असते. महाराष्ट्रातील बांधकाम कामगारांमध्ये पुरुष आणि महिला दोघेही समाविष्ट आहेत. ते विविध पार्श्वभूमीतून येतात आणि अनेकदा राज्याच्या ग्रामीण भागातून स्थलांतर करतात. बांधकाम कामगारांना अनेकदा कमी पगार आणि असुरक्षित कामाच्या परिस्थितीचा सामना करावा लागतो. त्यांना सामाजिक सुरक्षा आणि इतर फायद्यांपासूनही वंचित ठेवले जात होते परंतु आता मात्र महायुती सरकारच्या माध्यमातून बांधकाम कामगारांना अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याचे देखील यावेळी लोणीकरांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या मंडळामार्फत विविध क्षेत्रातील बांधकाम कामगाराची नोंद केली जाते तसेच त्यांना सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक तसेच आर्थिक सुविधा पुरविल्या जातात व अनेक योजनांचा लाभ दिला जातो. महाराष्ट्र बांधकाम कामगार योजना मंडळाचा मुख्य उद्देश हा विविध योजनांद्वारे इमारत व इतर बांधकाम कामगारांना सुरक्षा तसेच आरोग्य व इतर कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देणे हा आहे.

कामगारांसाठी कामाची चांगली परिस्थिती उपलब्ध करणे, रोजगार क्षमता व रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी शाश्वत आधारावर कौशल्य विकास करणे, सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी उपायांसाठी कार्य करणे, बांधकाम कामगारांपर्यंत पोहोचणे आणि त्यांच्याकडून माहिती गोळा करणे, लाभासाठीचा अर्ज दाखल करण्याच्या पद्धतींत सुलभपणा आणणे, कल्याणकारी योजनांच्या लाभ देण्याच्या पद्धतींत सुटसुटीतपणा आणणे, लाभाची रक्कम थेट बँक खात्यात जमा करणे, बांधकाम कामगार नोंदणी वाढविण्यासाठी त्यांच्या कामाच्या जागेवर जाऊन नोंदणी करणे, कार्यकारी क्षमतेमध्ये कुशलता आणणे.

प्रत्येक बांधकाम कामगाराला एकमेव नोंदणी क्रमांक देणे, कामांची स्थिती, व्यावसायिक आरोग्य आणि कामगारांच्या सुरक्षेसाठी धोरणे, कार्यक्रम, योजना, प्रकल्प राबवून कामगारांच्या जीवनशैलीत सुधारणा करणे, बांधकाम कामगार योजना ही महत्त्वाकांक्षी योजना राज्यभरातील विविध बांधकाम प्रकल्पांमध्ये गुंतलेल्या मजुरांचे सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करते ज्यामुळे कामगारांच्या चांगल्या भविष्यासाठी हा एक महत्त्वाचा उपक्रम असल्याचे देखील यावेळी लोणीकर यांनी स्पष्ट केले




बांधकाम कामगार या योजनेअंतर्गत राज्यातील बांधकाम कामगार सशक्त व आत्मनिर्भर होण्यास तसेच त्यांचे जीवनमान सुधारण्यास तसेच ते सशक्त व आत्मनिर्भर होण्यास मदत होणार असून या योजनेअंतर्गत लाभार्थी कामगारास आणि त्याच्या कुटुंबास विविध प्रकारचे लाभ दिले जाणार आहेत. बांधकाम कामगार योजनेअंतर्गत लाभार्थी कामगारास मिळणारे आर्थिक सहाय्य थेट त्याच्या बँक खात्यात डीबिटी च्या सहाय्याने जमा केले जात असून लाभार्थ्यास सामाजिक सुरक्षा, शैक्षणिक सहाय्य, आरोग्यविषयक सहाय्य तसेच आर्थिक सहाय्य केले जाते. अर्ज करण्याची प्रकिया ऑनलाईन करण्यात आलेली आहे त्यामुळे अर्जदार घरी बसून मोबाईल किंवा टॅबलेट च्या सहाय्याने अर्ज करू शकतात त्यामुळे अर्जदार कामगारास अर्ज करण्यासाठी कुठल्याही शासकीय कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची आवश्यकता भासणार नाही त्यामुळे अर्जदाराचा वेळ आणि पैसा दोघांची बचत होईल. त्याचप्रमाणे अर्जदार अर्ज केल्यापासून लाभ मिळेपर्यंत अर्जाची सर्व स्थिती आपल्या मोबाईल च्या सहाय्याने वेळोवेळी जाणून घेऊन शकतो. असेही लोणीकर यांनी यावेळी सांगितले.

बांधकाम कामगार योजनेचा लाभ नवीन इमारत, घरकुल बांधण्यापासून ते ती इमारत पूर्ण होईपर्यंत जे मजूर त्यामध्ये काम करतात अश्या सर्व कामगारांना या योजनेअंतर्गत नोंदणी करून या योजनांचा लाभ घेता येतो. अर्जदाराचे वय १८ ते ६० वर्ष दरम्यान असणे आवश्यक असून अर्जदार महाराष्ट्र राज्याचा मूळ रहिवासी व राष्ट्रीयकृत बँकेत त्याचे खाते असणारा असावा त्याचप्रमाणे मंदिर लाभार्थ्याचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपये पेक्षा अधिक नसावे आणि त्याचबरोबर वर्षभरातील किमान ९० दिवसापेक्षा अधिक संबंधित बांधकाम कामगाराने बांधकाम कामगार म्हणून काम केलेले असावे असे असल्यास महाराष्ट्रातील प्रत्येक पात्र लाभार्थी या योजनेचा लाभ घेऊ शकतो असेही लोणीकर यावेळी म्हणाले.

पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, या योजने अंतर्गत सर्व लाभ फक्त नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन मुलांसाठी लागू आहेत. जर बांधकाम कामगार केंद्र किंवा राज्य शासनाद्वारे सुरु एखाद्या योजनेअंतर्गत बांधकाम कामगार योजनेचा लाभ प्राप्त करत असेल तर अशा परिस्थितीत त्याला या योजनेचा लाभ दिला जात नाही. नोंदीत कामगाराच्या पहिल्या विवाहाच्या खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी ३० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य दिले जाते. बांधकाम कामगारांच्या मुलीच्या विवाहासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. तसेच कामगारांना दोन वेळचे मोफत जेवण दिले जाते. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजनेचा लाभ दिला जातो. प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाभ दिला जातो. प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा **पान २ वर**

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा ९ डिसेंबर रोजी शुभारंभ

**जालना । प्रतिनिधी -** भारतमातेच्या संरक्षणासाठी ज्यांनी आपले प्राणार्पण केले, अशा जवानांच्या कुटुंबियांच्या जिवनातील अडी-अडचणी दुर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे यासाठी व त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातुन सेवा निवृत्त झालेल्या जवानांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी संपुर्ण भारतात ७ डिसेंबर हा दिवस ध्वजदिन म्हणुन साजरा करण्यात येतो व त्या निमित्ताने ०७ डिसेंबर ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेर पर्यंत ध्वजदिन निधी संकलन केले जाते. दर वर्षी प्रमाणे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलन शुभारंभ सोमवार दि. ९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता सैनिक संकुल महासैनिक लॉन, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

सशस्त्र सेना ध्वजदिन २०२४ निधी संकलन शुभारंभ कार्यक्रमा निमित्ताने शहीद जवानांना श्रध्दांजली, देशाच्या सिमांचे रक्षण करतांना प्राणाचे बलीदान देवून शहिद झालेल्या सैनिकांच्या विरपत्नी, विरमाता व विरपिता यांचा गौरव करण्यात येणार आहे. तसेच नागरीकांमध्ये सैनिकांविषयी जन-जागृती व आपुलकी निर्माण करुन उत्कृष्ट कामगिरी करुन ध्वजदिन २०२३ निधी संकलन केलेल्या कार्यालयांना पारितोषिक कार्यालय प्रमुख व संबंधीत कर्मचाऱ्यास प्रशस्तीपत्र वाटप तसेच माजी सैनिक,विधवा पत्नी यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती, आर्थिक मदतीचे धनादेश, गौरव पूरस्कार व प्रशस्ती पत्र वाटप करण्यात येणार आहेत. तरी जिल्हयातील सर्व वीर पत्नी, वीर पिता, वीर माता, माजी सैनिक विधवी पत्नी, माजी सैनिक व त्यांचे अवलंबित, पत्रकार बांधव, उत्कृष्ट संकलन केलेल्या कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व सामान्य नागरिकांनी सदर कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि.२ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता पार पडली. नागरिकांनी आपल्या ग्राहक हितासंबंधीत तक्रारी बैठकीत प्रत्यक्ष उपस्थित राहून लेखी स्वरुपात सादर केल्या. जिल्ह्यातील ग्राहकांच्या प्राप्त तक्रारीवर वेळेत कार्यवाही करण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी संबंधितांना यावेळी दिले. बैठकीस जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सदस्य सचिव तथा जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांच्यासह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद समितीवर नियुक्त शासकीय व अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.